# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 05/04/2021 (सोमवार)

(सकाळ)

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
### स्थानिक गुन्हे शाखा नागपूर (ग्रामीण) व पोलिस स्टेशन केळवद
### यांनी संयुक्तरित्या केलेली कार्यवाही

दि. 03/04/2021 रोजी पोलिस स्टेशन केळवद येथील पोलिस स्टाफ पोलीस स्टेशन परीसरात पेट्रोलींग करीत असतांना पेट्रोलींग दरम्यान मुखबिरव्दारे खबर मिळाली की, येलकापार (मध्यप्रदेश) ते खुर्सापार ता. सावनेर या गावाकडे जाणा–या रोड ने एम.एच– 31/ए.एच– 9402 क्रमांकाच्या महिन्द्रा स्कारपिओ गाडी मध्ये अवैधरित्या कतलीसाठी गौवंशची वाहतुक केली जात आहे व ते वाहन सावळी मार्ग नागपुर च्या दिशेने जाणार आहे. अश्या मिळालेल्या खबरेवरुन पोलिस स्टॉपसह येलकापार (मध्यप्रदेश) येथुन खुर्सापार ता. सावनेर या गावात येणा–या रोडवर नाकाबंदी लावुन वाहन चेक करीत असतांना दि. 04/04/2021 चे 01.00 वा. दरम्यान एम.एच– 31/ए.एच– 9402 क्रमांकाच्या महिन्द्रा स्कारपिओ गाडी येतांना दिसली. त्या वाहन चालकास हाताने तसेच टॉर्चच्या प्रकाशाचे सहायाने थांबविण्याचा इशारा केला असता महिन्द्रा गाडीचालकाने आपली गाडी नाकाबंदीच्या ठिकाणी न थांबवीता सदर वाहन भरधाववेगाने व निष्काळजीपणे चालवुन रोडवरील वाहतुकीस व लोकांना धोका निर्माण होईल अश्या स्थितीत वाहन चालवित हायवे रोड ने नागपुर च्या दिशेने पळुन गेला. पोलिसांनी शासकीय वाहनाने स्कारपिआ गाडीचा पाठलाग केला व रात्र गस्तीवर असलेले स.पो.नि राजीव कर्मलवार, नापोशी राजेन्द्र रेवतकर, पो.शि. रोहन डाखोरे, चानापोशी अमोल कुथे सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांना सदरची माहिती देउन पाटणसावंगी टोल नाका जवळ त्यांचे मदतीने नाकाबंदी लावली असता एम.एच– 31/ए.एच– 9402 क्रमांकाच्या महिन्द्रा स्कारपिओ गाडीच्या चालकाने सावनेर पाटनसावंगी रोडने पळत असतांना गाडीचालकाने आपली गाडी पाटनसावंगी टोलनाकाचे आधी हायवे रोडच्या बाजुला उभी करुन गाडीतील चालक व वाहक हे पळतांना दिसले. दोघांना स्टॉपच्या मदतीने पकडुन ताब्यात घेउन स्कॉरपियो गाडी जवळ आणुन नाव गाव विचारले असता गाडी चालकाने आपले नाव आरोपी क्र. 1) करन जितेंद्र भावे वय 25 वर्ष रा. इंदोरी पोस्ट अंतरा पो.स्टे. बरघाट ता. बरघाट जि. शिवनी मध्यप्रदेश ह.मु. सुनील रामटेके लुबींनी नगर कामठी याचे घरी किरायाणे, वाहकाने आपले नाव 2) हर्षत नंदकिशोर मेश्राम वय 19 वर्ष रा. गवळीपुरा जुनी कामठी भिमनगर कामठी असे सांगुन स्कॉरपीओ गाडीचा मालक नामे ऐफाज रा. टिपुसुल्तान चौक टेकानाका नागपुर याची असुन त्याने चमौजा गौलगुंडा जि. छिंदवाडा मध्यप्रदेश येथुन स्कॉरपीओ गाडीमध्ये 06 नग गौवंश गाई मध्ये भरुन दिले व स्कॉरपिओ गाडी घेउन नागपुर मोमीनपुरा येथे घेउन जाण्यास सांगीतले. आरोपीतांनी एम.एच– 31/ए.एच– 9402 क्रमांकाच्या महिन्द्रा स्कारपिओ गाडीच्या सिटच्या मागे 06 गौवंश जनावरे अत्यंत क्रुंर व निर्दयतेने डांबुन चारापाणी न देता कोंबुन दाटीवाटीने अपु–या जागेत ठेउन दिसुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन 06 गोवंश गाई जनावरे प्रत्येंकी कि. 60,000/–रु. व एम.एच– 31/ए.एच– 9402 क्रमांकाच्या महिन्द्रा स्कारपिओ गाडी कि. 5,00,000/–रू. असा एकुण कि. 5,60,000/–रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपी विरूध्द पोलिस स्टेशन केळवद येथे अप क्र 58/21 कलम 279, 34 भादवी, सहकलम 11(1), 11(1)(घ), 11(1)(ड), 11(1)(च) प्राण्यांना निर्दयतेने वागणुक प्रती. अधी. 1960, सहकलम 5(अ), 9 महाराष्ट्र प्राणी रक्षण अधि. 1995, सहकलम 119 महाराष्ट्र पोलिस अधि. 1951, सहकलम 192(अ),179,184 मोटार वाहन कायदा अन्वये गुन्हा नोंद करून सदर गुन्हयाचा तपास पोहवा किशोर ठाकरे हे करीत असुन फरार आरोपीचा शोध सुरू आहे.

सदरची कारवाई मा. श्री राकेश ओला पोलिस अधिक्षक नागपुर ग्रा., मा श्री. राहुल माकणीकर अपर पोलिस अधिक्षक ना. ग्रा., मा. श्री. अशोक सरंबळवर उपविभागीय पोलिस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शनाखाली पोनि दिलीप ठाकुर ठाणेदार पो स्टे केळवद, सपोनि राजीव कर्मलवार, पोउपनि अर्जुन राठोड, पोहवा किशोर ठाकरे, नापोशी राजेंद्र रेवतकर, चानापोशी अमोल कुथे, पोशि धोंडुतात्या देवकते चालक पो.शि. राहुल, पो.शि. रोहन डाखोरे यांनी केली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर